# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 16/12/2019 (सोमवार)
# (दुपार)

---

## चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 30 कि.मी अंतरावर फ्रेंन्डस कॉलोनी नागपुर ते जुना धापेवाडा येथे दिनांक 08/12/2019 चे 14:00 वा. ते 15:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– कलावती केशवराव धोटे, वय 65 वर्ष, रा. प्लाट नं 25, गृहनिर्माण सोसायटी पन्नासेले आउट, नागपुर यांना स्टारबस मध्ये झोप लागली. या संधीचा फायदा घेउन फिर्यादीच्या सिटच्या बाजुला बसलेली निळया गर्द रंगाचे सलावर सुट घातलेली 30 ते 32 वर्षाची महीला अज्ञात आरोपीने बॅग मध्ये ठेवलेली पर्स वा त्या मध्ये ठेवलेले नगदी 2,500/–रू. व साडेतिन तोडयाचा गोप कि. 67,500/–रू. व कागदपत्रे असा एकुण 70,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ लक्ष्मण रूढे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील मौजा खेडी शिवार तारणा फाटयाजवळ उमरेड भिवापुर रोड येथे दिनांक 15/12/2019 चे 13:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संदीप भिमरावजी चिकराम, वय 26 वर्ष, रा. नागपूर प्लॉट नं 110 बिडगाव पारडी नागपूर हे त्यांच्या एमएच–26/एस–1118 क्रमांकाचा कारने ते नागपूर ते ठाणा मार्गाने जात होते. दरम्यान एमएच–04/क्यु–9861 क्रमांकाचा रिट्स कारचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन विरूद्ध दिशेने येऊन फिर्यादीच्या कारला समोरून धडक दिली. या अपघातात आरोपीची कार पलटी होवुन आरोपी स्वतः गंभीर जखमी होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. तर फिर्यादी हे जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सह कलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अजीत ठाकुर हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर हल्दीराम कंपनी गुमथाळा येथे दिनांक 15/12/2019 चे 06:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दुग्रेश नरेश पाचे, वय 29 वर्ष, रा. चितापुर कुही मौदा नागपूर हा कंपनीत काम करीत असता हात दुखत असल्याने काम करने बंद केले. दरम्यान आरोपी नामे– योग थोराइथ, रा. हल्दीराम कंपनी, गुमथाळा ता. कामठी हा आला व म्हणाला की, ''तु का काम थांबविले,'' फिर्यादीने हात थकले असल्याने

थोडा आराम केला, असे म्हटले. या कारणावरून आरोपीने फिर्यादीस शिविगाळ करून पाठीवर लात मारली व कंपनीतील लोखंडी प्लेटने फिर्यादीचे डाव्या हाताला, मानेवर आणि कमरेवर मारहाण केली. तसेच आरोपीने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जंगवाड हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 25 कि.मी अंतरावर मौजा पाचगाव येथे दिनांक 15/12/2019 चे 17.00 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) जितु हिरामन हटवार, 2) चेतन गंगाधर हटवार, 3) किशोर यशवंत हटवार, 4) तेजस किशोर हटवार, 5) सौ.आशाबाई हिरामण हटवार व 6) सौ. रेखाबाई गंगाधर हटवार, सर्व रा. पाचगाव त. उमरेड, जि. नागपुर यांनी ग्रामपंचायत व होळीचे सणात झालेल्या भांडणाच्या वैमन्यस्यावरून गैरकायद्याची मंडळी जमा केली. तसेच फिर्यादी नामे– मंगेश वल्द रामाजी हटवार, वय 30 वर्ष, रा. पाचगाव वार्ड नं. 01 व पत्नी, भाउ व वडिल यांचे सोबत आरोपीतांनी झगडा भांडण केले. यानंतर आरोपीतांनी भांडणात काठी रॉडने फिर्यादी व त्यांच्या सोबतच्यांना मारहाण करून शिवीगाळ केली. तसेच फिर्यादीच्या भावाचे गाडीचे तोडफोड करून नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,147,148,149, 323, 504, 506, 427 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. परघने हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर